# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in    दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४   email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./2382/२०२२    दि. 07 /०७/२०२२

## परिपत्रक

**विषय:- महाराष्ट्र शासन व इन्फोसिस लि. बंगलोर यांच्याबरोबर झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नोंदणीबाबत.**

संदर्भ :- उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र-युएनआय/इन्फोसिस करार/विशि-१/७२८४, दि. ०६/०७/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, इन्फोसिस लि. बंगलोर या कंपनीबरोबर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सामंजस्य करार केलेला असून सदर सामजंस्य करारांतर्गत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून प्रौढांपर्यंत सर्वांना इन्फोसिस लि. या कंपनीच्या इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड या उपक्रमांतर्गत ३९०० हून अधिक अभ्यासक्रमाचे वर्ग आभासी प्रणालीद्वारे घेण्याचे ठरले आहे.

तथापि उपरोक्त इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड प्रकल्पामध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकांच्या नोंदणीस अल्प प्रतिसाद दिसून आलेला असून विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच गोंडवाना विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभागप्रमुख यांनी त्यांच्या स्तरावर अधिनस्त शिक्षकांना व विद्यार्थ्यांना इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड प्रकल्पांर्गत नोंदणीस प्रोत्साहित करावे.

सदर उपक्रमांतर्गत अधिकच्या माहितीसाठी तसेच समन्वय साधण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकाऱ्यांची माहिती संदर्भिय पत्रामध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

7.7.2022
**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. सर्व शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख, पी.जी.टी.डी., गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
५. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
६. मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. जनसंपर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
९. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2335 दि. 7/7/22
जावक क्र. ........ दि. ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ......
जावक क्र. 5528 दि. 7/7/22

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९

क्रमांक- युएनआय/इन्फोसिस करार/विशि-१ 6228 दिनांक- 6 JUL 2022

प्रति,

कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
प्राचार्य/संचालक, शासकीय महाविद्यालये/संस्था.

**विषय- महाराष्ट्र शासन व इन्फोसिस लि. बंगलोर यांच्याबरोबर झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नोंदणीबाबत.**

संदर्भ १.संचालनालयाचे समक्रमांक दि.३० मार्च, २०२२
२.संचालनालयाचे समक्रमांक दि.१८ एप्रिल,२०२२
३.संचालनालयाचे समक्रमांक दि. २० एप्रिल,२०२२
४.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०६ जुलै,२०२२ रोजीची ऑनलाईन बैठक.

उपरोक्त संदर्भिय ०४ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इन्फोसिस लि.बंगलोर या कंपनीबरोबर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सामंजस्य करार केला असून सदर सामजस्य करारांतर्गत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून प्रौढांपर्यंत सर्वांना इन्फोसिस लि.या कंपनीच्या इ.स्प्रिंगबोर्ड या उपक्रमांतर्गत ३९०० हून अधिक अभ्यासक्रमाचे वर्ग आभासी प्रणालीव्दारे घेण्याचे ठरले आहे.

सदर उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई आणि उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, सर्व अकृषि विद्यापीठे, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था तसेच कंपनीच्या इन्फोसिसच्या स्प्रिंगबोर्ड यांचेशी समन्वय साधण्यासाठी खालील अधिकाऱ्यांची संदर्भिय क्रमांक २ अन्वये नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| श्री.स्वरुप रा मणेरीकर, | सहाय्यक प्राध्यापक, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई | 919405816597 | swaroopmanerikar@gmail.com |
| श्रीमती निता पु खोब्रागडे | सहाय्यक प्राध्यापक, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, मुंबई | 919326965035 | neetakhobragade03@gmail.com |

AR(ESH) issue circular 6.7.2022

श्री खोपकर 7.7.2022

दि.०६ जुलै,२०२२ रोजी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झालेली असून यामध्ये इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड प्रकल्पामध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकांच्या नोंदणीस अल्प प्रतिसाद दिसून आला आहे.

तरी कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व प्राचार्य/संचालक, शासकीय महाविद्यालये/संस्था यांनी आपल्या अधिनस्त शिक्षकांना इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड प्रकल्पांतर्गत नोंदणीस प्रोत्साहित करावे.

सर्व विभागीय सहसंचालक यांनी आपल्या अधिनस्त अकृषि विद्यापीठाचे कुलसचिव,शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था/विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांची बैठक आयोजित करुन इन्फोंसिस स्प्रिंगबोर्ड प्रकल्पात शिक्षक नोंदणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी व खालील विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ सादर करावी.

| **विभागाचे नांव-** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | विद्यापीठ/ महाविद्यालयाचे नांव | इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड नोंदणी झालेल्या शिक्षकांची संख्या | इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
| | | | |

विषयांकित प्रकरणी आपण केलेल्या कार्यवाहीबाबतचा आढावा घेण्यासाठी लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी स्वत: लक्ष घालून कार्यवाही करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सादर**
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**
श्री.तिरुमला अरोही, वरिष्ठ उपाध्यक्ष, इन्फोसिस लि. शिक्षण प्रशिक्षण असेसमेंट, ४४, इलेक्ट्रानिक्स सिटी, होसुर रोड, बंगलोर ५६० १००